!! श्री !!

शिवसेना

खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३९०/१०/१०/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# बैठकित होणाऱ्या निर्णयांची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करा

## जिल्हास्तरीय विद्युतीकरण बैठकित खासदार चंद्रकांत खैरे यांचे निर्देश

### सणोत्सव व परिक्षाकाळात भारनियमन सक्तीचे करु नका

**संभाजीनगर ( ता.२९ ) :** लोकप्रतिनिधीच्या आदेशाला दुर्लक्ष करणाऱ्या, तसेच बैठकिमध्ये होणाऱ्या निर्णयांची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिले, तसेच दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना ७ दिवसाच्या आत डि.पी. (रोहित्र) देण्याचे व सणोत्सव काळात भारनियमन न करण्याची सुचना बैठकिस केली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. निधी पांडेय यांनी डि.पी.डि.सी. अंतर्गत दिड कोटी रुपयांच्या प्रस्तावाला दुजोरा देत प्रस्ताव व जागे संदर्भात समस्या असल्यास त्वरीत निकाली काढणार असल्यांचे सांगितले. यावेळी आमदार संजय शिरसाट, आमदार संदिपान भुमरे, उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडेले, जिल्हायुवाधिकारी नगरसेवक ऋषिकेश खैरे, नगरसेविका अंकिता विधाते, नगराध्यक्ष दत्ता गोर्डे, विलास भुमरे आदि लोकप्रतिनिधींनी आपआपल्या मतदार संघाच्या समस्या मांडल्य. जिल्ह्यातील भुमीगत केबल संदर्भात केंद्राकडून विशेष निधी आणणार असुन विजेच्या आधुनिकिकरणाच्या योजना राज्य व केंद्र शासनाच्या सर्वाच्या प्रयत्नाने आणणार असल्यांचे त्यांनी बैठकित सांगितले.

जी. टी. एल. च्या बाबतीत मनपा व महावितरणे संयुक्तपणे चौकशी करावी, जीटीएलमुळे दोघांचेही नुकसान भरपाई काय झाले आहे. हे पुढील बैठकिपर्यंत कळविण्याची सुचना केली. नगरसेवक ऋषिकेश खैरे यांनी ही पूर्वी दोन्ही खांबामध्ये अंतर जास्त घेतल्याने बऱ्याच ठिकाणी पोल बसविण्याची गरज आहे, उघड्या डि.पी. पोल बॉक्स, पथदिवे, हायमास्ट याबाबत दिवाळीपुर्वी मनपा–महावितरणने लवकर निर्णय घेण्याची मागणी केली.

या बैठकिस महावितरणचे मुख्य अभियंता सतिष चव्हाण, नगराध्यक्ष दत्ता गोर्डे, सभापती विलास भुमरे, भिकाजीपंत जोशी, ॲड़ अशोक पटवर्धन, संजय निकम, किशोर कुकलारे, अनिल जैस्वाल, अंबादास नलावडे, बंडू शिंदे, हरिभाऊ हिवाळे पाटील, माणिक गंगवाल, पोलिस निरीक्षक नागनाथ कोडे, विठ्ठल डमाळे, अनिल गिऱ्हे आदिंसह शहरी व ग्रामीण भागातील वीज ग्राहकांची व नागरिकांची उपस्थिती होती.

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , ganeshwagh4400@gmail.com manojwadgaonakar@gmail.com

8484066606/9604384400/8983560831